


जयहिंद
प्रकाशन


ठकास महाठक

लेखिका : वंदना विटणकर

एक होतं छोटंस खेडेगाव. गावातले बहुतेक लोक गरीबच होते. काबाडकष्ट करून जेमतेम दोन वेळची भाकरी त्यांना मिळत असे. त्या गावात दोन चोर राहत असत. लोकांना लुबाडून पोट भरणं हा त्यांचा धंदा. नानातऱ्हेच्या युक्त्या लढवून ते चोऱ्यामाऱ्या करीत आणि दुसऱ्यांच्या कष्टाची कमाई लुबाडून नेत. बिचारे गावकरी चोरांच्या नावाने तळतळाट करीत, त्यांना शिव्याशाप देत, पण त्यानं काय होणार? चोरांचा धंदा मजेत चालला होता. कारण त्या चोरांना अजून कुणी शिरजोर भेटलाच नव्हता. लोकांना वाटे, 'या ठकांना एखादा महाठक भेटल्याशिवाय यांची खोड जिरणार नाही.' लोक त्या दिवसाची वाट पाहत होते. गावातल्या फुटकळ चोऱ्या करून एके दिवशी चोर कंटाळले. आधीच गावातले लोक गरीब. त्यांच्याकडे चोरी करून काय मोठं डबोल मिळणार? तेवढ्या तुटपुंज्या मिळकतीवर चोरांचं भागेना. तेव्हा त्या दोघांनी ठरवलं की शहरात जाऊन आपल्या धंद्याचा जम बसवायचा. शहरातले लोक श्रीमंत, तिथे आपला धंदा झकास चालेल. बेत पक्का करून दोन्ही चोरांनी एका भल्या पहाटे गाव सोडलं नि ते शहराकडे निघाले.

मजलदरमजल करीत त्यांचा प्रवास चालला होता. वाटेत भेटणाऱ्या प्रवाशांकडून ते शहराची माहिती गोळा करीत होते. शहरात श्रीमंत लोक कोण आहेत, किती आहेत, ते कुठं राहतात वगैरे सारी बित्तंबातमी त्यांनी मोठ्या कुशलतेनं गोळा केली. त्यात एक महत्त्वाची गोष्ट त्यांना कळली ती म्हणजे, शहरात एक म्हातारी राहते. तिच्याकडे खूप पैसाअडका आहे. पण ती म्हातारी महाधूर्त आहे. आपल्या संपत्तीचा तिनं कुणाला थांगपत्ता लागू दिलेला नाही आणि तिला अजून कुणी फसवू शकलेलं नाही.

चोरांनी विचार केला, शंभर ठिकाणी चोऱ्या करण्यापेक्षा त्या म्हातारीची संपत्ती मिळवली, तर



जन्माची ददात मिटेल. ती असेल ठक, पण आपणही महाठक आहोतच की! बघू या कोण हारतं नि कोण जिंकतं ते? आणि मग आपसात ठरवल्याप्रमाणे शहरात जाताच चोरांनी म्हातारीचं घर शोधून काढलं. घर कसलं? ती बिलंदर म्हतारी एका छोट्या झोपडीत राहत होती. त्या झोपडीचा अवतार, म्हातारीची फाटकीतुटकी अंथरूणं-पांघरूणं, विटके कपडे आणि एकूणच सगळी कळा पाहून कुणाला स्वप्नातही वाटलं नसतं की, ही म्हातारी खूप श्रीमंत आहे. पण चोर गोंधळले नाहीत. तो म्हातारीचा वरचा देखावा आहे, हे त्यांनी ओळखलं.

"आजीबाई, आम्ही प्रवासी आहोत. खूप थकलो आहोत. घोटभर पाणी मिळेल का?" त्यांनी काकुळतीने विचारलं. "या बाबांनो या. उन्हातानाचे आलात. घटकाभर बसा. नुसतंच पाणी कशाला? घासभर भाकरतुकडा खा. थोडी विश्रांती घ्या. मग पुढं जा." म्हातारी प्रेमाने म्हणाली.

चोरांना काय? तेच हवं होतं. ते ऐसपैस बसले. गप्पा मारता-मारता त्यांचं जेवण चाललं होतं. म्हातारी चांगलीच बोलकी होती. तिच्या जिभेवर जणू काय साखरच पेरली होती!

"कुठल्या गावचे रे बाबांनो तुम्ही? कुठपर्यंत जाणार?" म्हातारीनं चौकशी केली.

"‘पोटापाण्यासाठी काहीतरी कामधंदा करायला निघालो आहोत आम्ही आजीबाई. म्हटलं शहरात काहीतरी रोजगार मिळेल.’' चोरांनी बतावणी केली.

"अरे, मग माझ्या झोपडीतच राहा ना. मला सोबत होईल नि तुमचंही काम होईल." म्हातारीनं आग्रह केला. मग काय विचारता? चोरांचं चांगलंच फावलं! त्यांनी म्हातारीच्या घरात ऐसपैस पथारी पसरली.

दुसऱ्या दिवसापासून ते म्हातारीची मोठ्या मानभावीपणानं सेवा करू लागले. दिवसभर ते म्हातारीला कुठल्याच कामाला हात लावू देत नसत. रात्री झोपताना आळीपाळीनं तिचे पाय चेपून देत. एकीकडे ही सेवा चालली असताना दुसरीकडे त्यांचं महत्त्वाचं काम चालू होतं. म्हातारीनं पैसा कुठं दडवून ठेवला असावा, याचा ते कसून शोध घेत होते. म्हातारी झोपडीत राहत असली, तरी तिची बरीच मोठी शेती होती, मळा होता आणि बरीच मायाही तिनं गाठीला बांधून ठेवली आहे, असा त्यांचा कयास होता. पण तो पैसा म्हातारीनं कुठं दडवलाय याचा त्यांना थांगपत्ता लागेना. रात्री म्हातारी झोपली की त्यांची शोधाशोध चालू व्हायची. हे उकरून पाहा, ते उकरून पाहा, असा त्यांचा उद्योग रात्रभर चाललेला असायचा. म्हातारीची चाहूल लागली की ते पुन्हा झोपी गेल्याचं सोंग घ्यायचे. कधी-कधी त्यांना वाटे

म्हातारी आपल्यावर पाळत तर ठेवीत नाही ना? पण तिला त्यांचा संशय आल्याचं कधी जाणवलं नाही. मात्र ती वारंवार म्हणायची, "अलीकडे चोरांचा फार सुळसुळाट झालाय. सावध असा."

एके दिवशी रात्री दोघा चोरांनी म्हातारीची चूल उकरून काढली. चुलीखाली तिनं नक्कीच धन पुरून ठेवलं असावं असं त्यांना वाटत होतं. पण कसलं काय नि कसलं काय? रात्रभर खणून-खणून दम निघाला. पण धन काही सापडेना. इतक्यात त्यांना म्हातारीची चाहूल लागली. लगबगीनं आपल्या अंथरुणावर जाऊन पडले. म्हातारी उठून त्या ढिगाऱ्याजवळ गेली आणि सगळा प्रकार लक्षात येताच मोठमोठ्यानं रडू लागली, ओरडू लागली. चोर धावतच तिच्याजवळ आले. त्यांनी परोपरीनं म्हातारीची समजूत घातली. पण ती काही ऐकेना. तिच्या आरड्याओरड्यानं लोक जमा झाले तर उगाच गवगवा व्हायचा याची त्यांना काळजी पडली होती. म्हातारी रडतच होती - "माझी चूल की रे मेल्यांनी उखडली. आता मला नवीन झोपडी बांधायला लागणार." शेवटी त्या दोघांनी तिला नवीन झोपडी बांधून देण्याचं आश्वासन दिलं. आणि त्याप्रमाणे त्यांनी चारपांच दिवस खपून म्हातारीला नवी कोरी झोपडी बांधून दिली.

असेच आणखी काही दिवस गेले. बोलता-बोलता चोरांना सुगावा लागला की, म्हातारीनं धन शेतात पुरून

ठेवलं आहे. झालं! लगेच ते कामाला लागले. म्हातारीचा डोळा चुकवून त्यांनी शेत खणायला सुरुवात केली. एक जण म्हातारीवर पहारा करायचा आणि दुसरा शेत खणायचा. अशी आळीपाळीनं त्यांची खोदाखोदी सुरू होती. बघता-बघता सारं शेत खणून झालं. पण धनाचा कणदेखील सापडला नाही. चोर वैतागले. कपाळाला हात लावून बसले. अशा ऐन वेळी म्हातारी येऊन उभी राहिली आणि शेताचा तो अवतार बघताच मोठमोठ्यानं रडू लागली. "देवा रे देवा! काय करू आता? या चोरांनी नुसता छळवाद मांडलाय. माझ्या म्हातारीचं सारं शेत की रे उकरून काढलं मेल्यांनी!" म्हातारीला गप्प करता-करता चोरांची पुरेवाट झाली. करता काय! 'चोरीचा मामला अन् हळूहळू बोंबला!' शेवटी म्हातारी म्हणाली, "बाबांनो, अनायसे शेत खणून निघालंच आहे तर तुम्ही नांगरणी करून टाका शेताची. नाहीतरी आता पेरणीचे दिवस ठेपलेच आहेत." चोरांनी मुकाट्यानं माना डोलावल्या. करतात काय? धन मिळेपर्यंत त्यांना म्हातारीची खुशामत करणं भाग होतं. नाइलाजान त्यांनी शेताची नांगरणी केली. श्रमांची सवय नसल्यानं त्यांचा चांगलाच पिट्टया पडला. म्हातारीला फुकटचे नोकर मिळाले. एवढ झालं तरी चोर हिम्मत हरले नाहीत. म्हातारीच्या धनाचा पत्ता लावायचाच असा त्यांनी निश्चय केला. एव्हाना म्हातारी त्यांच्यावर

भलतीच खूष झाली होती. एकदा बोलता-बोलता तिनं त्या दोघांना विश्वासात घेतलं आणि सांगितल - "हे बघा, तुम्ही भल्या घरातली चांगली मुलं दिसता. माझा तुमच्यावर पक्का विश्वास बसला आहे. म्हणूनच आज मी तुम्हांला एक गुप्त गोष्ट सांगणार आहे. या कानाची त्या कानाला कळू द्यायची नाही, बरं का! मी किनई बरेच दागदागिने, पैसाअडका साठवला आहे. गावात चोराचिलटांचा सुळसुळाट तुम्ही पाहताच आहात. म्हणून मी माझं सगळं धन झोपडीमागे जी पडकी विहीर आहे ना तिच्यात दडवून ठेवलं आहे. धनाची पेटी तळाशी ठेवून वर भरपूर दगडधोंडे, काटेकुटे भरले आहेत. विहीर इतकी ओसाड आहे की तिच्यात धन असेल असं चोरांना स्वप्नातसुद्धा वाटणार नाही! तेव्हा तुम्ही ही गोष्ट कुणाला सांगू नका. आणि विहिरीवर चांगला पहारा ठेवा."

म्हातारीचं बोलणं चोर कान टवकारून ऐकत होते. त्यांचा आनंद गगनात मावेना त्यांचे इतके दिवसांचे कष्ट अचानक फळाला आले! आता मात्र त्यांना म्हातारीच्या झोपडीत क्षणभरदेखील राहवेना. विहिरीतलं धन केव्हा एकदा हाती पडतंय असं त्यांना होऊन गेलं. लगेच एका चांदण्या रात्री त्यांनी मुहूर्त साधला. म्हातारी डाराडूर झोपलेली पाहून ती दोघं विहिरीवर आली. एक भला मोठा जाडजूड दोरखंड त्यांनी बरोबर आणला. एक चोर

दुसऱ्याला म्हणाला - "हे पाहा, तू आत उतर. आतली धनाची पेटी या दोरखंडाला बांध आणि जोराचा हिसका दे म्हणजे मी पेटी वर घेईन. नंतर दोर टाकून तुला बाहेर काढीन." दुसऱ्या चोरानं कंबरेला दोरखंड बांधला आणि तो विहिरीत उतरला. आत उडी टाकताच कचकन सारे काटेकुटे त्याच्या अंगात शिरले. बिचारा रक्तबंबाळ झाला, पण त्यानं हूं की चूं केलं नाही, कण्हत, कुथत तो काटे बाजूला सारू लागला. पाहतो तर काट्याकुट्यांखाली खच्चून दगड भरलेले! ते दगडधोंडे बाजूला करता-करता घामाघूम झाला. त्याच्या मनात विचार आला - 'मी एवढे कष्ट करायचे नि वरच्याने मात्र फुकटच्याफाकट धन मिळवायचं, का म्हणून? हे नाही चालू देणार. मला पेटी मिळाली की तिच्यातलं अर्धं धन मी काढून घेणार!' वरचा चोर विचार करीत होता की, आतल्या चोरानं एकदा का दोरखंडाला पेटी बांधली की, ती बाहेर काढून तिच्यासकट पोबारा करायचा. आतला चोर मरू दे आतल्या आत. त्याच्या मूर्खपणाचं बक्षीस त्याला मिळालंच पाहिजे.'

बराच वेळ खटपट केल्यावर आतल्या चोराच्या हाताला एकदाची ती पेटी लागली. चांगलीच लांबरुंद, भलीमोठी पेटी होती ती. तिच्यात खच्चून ऐवज भरला असेल, या कल्पनेनं चोराच्या तोंडाला पाणी सुटलं. इतका वेळ झालेले श्रम तो विसरूनसुद्धा गेला! एवढी संपत्ती मिळाल्यावर

आयुष्यभर चिंता नको, असं गोड स्वप्न पाहत त्यानं पेटी उघडली आणि बघतो तर काय? सारी पेटी दगडधोंड्यांनी गच्च भरलेली! मग मात्र त्याचे हातपाय गळाले. सारे त्राणच संपले त्याचे! म्हातारी चांगलीच बिलंदर निघाली होती. असा राग आला त्याला तिचा! पण तिथं वेळ घालवून चालणार नव्हतं. बाहेर पडणं महत्त्वाचं होतं. दोरखंडाला पेटी बांधून वर पाठवली आणि वरच्या चोराला वस्तूस्थिती कळली, तर तो आपल्याला वर काढणार नाही याबद्दल



त्याची खात्री होती आणि त्यात म्हातारीनं तिथं येऊन नेहमीप्रमाणे आरडाओरडा केला, तर त्याची धडगत नव्हती. आता काय करावं बरं? डोक खाजवून त्यानं विचार केला. शेवटी त्याला एक युक्ती सुचली. त्यानं काय केलं, पेटीतले दगडधोंडे काढून फेकून दिले. पेटीला दोरखंड बांधला आणि आत तो स्वतः जाऊन बसला. इतकं झाल्यावर त्यानं दोरखंडाला जोराचा हिसका दिला. वरचा चोर वाटच बघत होता. खुणेचा इशारा मिळताच त्यानं लगबगीनं पेटी बाहेर ओढायला सुरुवात केली. पेटीचं वजन भलतच होतं. ती वर ओढताना त्याला खूपच त्रास होतं होता. दोन्ही हात सोलून निघत होते. पण तरीही हूं की चूं न करता तो पेटी ओढत होता. ओढता-ओढता गोड मनोराज्यं करीत होता. 'पेटी हाताला लागताच इथून सूंबाल्या ठोकायचा. मग सारं धन माझ्या एकट्याचं होईल. आयुष्यभर बसून राहता येईल.' विचार करता-करता त्यानं पेटी बाहेर काढली आणि लगेच ती डोक्यावर घेऊन तो पळत सुटला. म्हातारी झोपडीच्या फटीतून सारा प्रकार पाहत होती. तिला हे सारं अपेक्षितच होतं. मनातल्या मनात हसत ती गाढ झोपी गेली. इकडे डोक्यावर पेटी घेतलेला हा चोर पळत होता - पळतच होता. त्याला धाप लागली होती. पेटीच्या वजनानं मान अवघडली होती. पळून-पळून पायात गोळे आले होते. पण त्याला कसलीच पर्वा नव्हती. पेटीतला चोर मात्र आरामात

डाराडूर झोपला होता! बरच अंतर कापल्यावर मात्र चोराला पाय उचलेनात. आतापर्यंत चांगली फटफटीत पहाट झाली होती. रस्त्याच्या आतल्या बाजूची एकान्तातली जागा पाहून त्यानं डोक्यावरची पेटी मेटाकुटीनं खाली उतरवली. पहाटेचा गार वारा वाहत होता. त्यामुळे त्याला थोडी हुशारी वाटली. थोडसं हाशहुश केल्यावर त्यानं मोठ्या उत्सुकतेन पेटी उघडली. आणि त्याला धक्काच बसला! त्याचा मित्र - दुसरा चोर सावकाशपणे बाहेर पडला! बराच वेळ कुणी काही बोललं नाही. शेवटी आतला चोर बाहेरच्याच्या पाठीवर थाप मारीत म्हणाला, 'मित्रा, आता झाली गेली गोष्ट विसरून जा. तिचा विचार सोडून दे. आपण स्वतःला फार चतुर समजत होतो. पण म्हातारी आपल्यापेक्षा बिलंदर निघाली. तिनं आपल्याकडून झोपडी बांधून घेतली. शेत नांगरून घेतलं. पडकी विहीर उपसून घेतली आणि शेवटी दगडविटांनी गच्च भरलेली ही तुटकीफुटकी पेटी आपल्या हाती दिली. मोठ्या हिंमतीनं तिनं स्वतःच धन आपल्या तडाख्यातून वाचवलं. आता त्रागा करून उपयोग काय? ठकाला कधीना कधी महाठक भेटतो, हेच खरं!

* * *

आकाशकंदील

लेखक : वंदना विटणकर

ही गोष्ट आहे चांदोबाची. चांदोबा म्हणजे तुम्हा मुलांचा जिवाभावाचा मित्र! चांदोबा नसला की तुम्हा मुलांना करमत नाही नि मुलांशिवाय चांदोबाला चैन पडत नाही, होय की नाही? पिठासारखं पांढरं शुभ्र चांदणं पसरवणाऱ्या चांदोबावर तुमचं मनापासून प्रेम आहे, हे मला चांगलं माहीत आहे, बरं का. म्हणूनच



तर आकाशात चांदोबा आला की तुम्ही त्याच्याशी गुलुगुलु गप्पा मारीत बसता.

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा काय झालं, दिवाळी जवळ येऊन ठेपली होती. चांदोबा आणि छोट्या मुलांचे कसलेतरी बेत रचण्याचं काम जोरात चाललं होतं. दिवाळीच्या दिवसांत कायकाय मजा करायची, कुणी कसले कपडे घालायचे, फटाके-फुलबाज्या-सुरनळे वगैरे गोष्टींची वाटणी कशी करायची, किल्ले कसे आणि कुठे बांधायचे, गंमतीजमतीचे, करमणुकीचे कार्यक्रम कोणते ठरवायचे - एक ना दोन - एकापेक्षा एक सरस बेत आखले जात होते नि खोडलेही जात होते. रोज कुणालातरी एखादी नवीन कल्पना सुचायची. कुणाला, ठरलेल्या बेतात काहीतरी दोष दिसायचा. मग पुन्हा चर्चा, वादविवाद. रात्री कितीतरी उशिरापर्यंत चांदोबा नि मुले यांच्या अशा बैठका रंगायच्या.

शेवटी एकदाची दिवाळी आली. घराघरांतून पक्वान्नांचा सुवास दरवळू लागला. अंगणं रांगोळ्यांनी सुशोभित झाली. नवीन कपडे लेऊन प्रसन्नपणे लोक एकमेकांना भेटू लागले. इकडे चांदोबाचीही तयारी झाली. त्यानं आपला हरणांचा रथ फुलांनी मढवून तयार केला. सशालाही उंची कपड्यांनी सजवला. स्वतः चांदोबानं भरजरी कपडे अंगावर घातले. रुपेरी मुकुट डोक्यावर चढवला. मोत्यापोवळ्यांचे दागिने त्याच्या पोशाखावर झळकू

लागले. चंदेरी कलाकुसर केलेल्या पादत्राणांनी तर चांदोबाच्या रुबाबात कमालीची भर टाकली. अशा थाटात झगमग-झगमग करीत चांदोबाची स्वारी मुलांना भेटायला निघाली. चांदोबाचा राजवाडाही त्या वेळी दिव्यांच्या रोषणाईनं नुसता लखलख करीत होता.

चांदोबा राजवाड्याबाहेर पाऊल टाकतो तो काय! आपला हरणांचा रथ त्याला तिथे दिसेना. आपल्या लाडक्या सशासकट हा रथ गेला तरी कुठं? चांदोबा विचार करू लागला. असं पूर्वी कधीच झालं नव्हतं. चांदोबाला विचारल्यावाचून हरणांचा रथ कुठंच जाऊ शकत नव्हता. आज हे असं झालंच कसं?

चांदोबानं आपले किरणदूत रथ शोधायला चारी दिशांना ताबडतोब रवाना केले. बिचाऱ्या दूतांनी सारं आकाश पालथं घातलं. पण छे! हरणांचा रथ काही त्यांना कुठं दिसला नाही. थोड्याच वेळात सगळ्या चंद्रराज्यात बातमी पसरली - 'चांदोबाचा हरणांचा रथ नाहीसा झाला.' ज्याच्या-त्याच्या तोंडी एकच विषय घोळू लागला - 'चांदोबाचा हरणांचा रथ -' सगळे जण काळजीत पडले. कारण त्यांना माहीत होतं की, ससा आणि हरणांचा रथ यांच्यावर चांदोबाचा फार जीव आहे. त्यांच्यावाचून त्याला क्षणभरही चैन पडणार नाही.

रथ शोधूनशोधून चांदोबा थकून गेला. झाडून सगळ्या चांदण्यांना त्यानं विचारलं, "माझा हरणांचा रथ आणि

ससा तुम्ही कुणी पाहिला का?'' सगळ्यांकडून एकच उत्तर मिळालं, ''नाही. आम्हांला तुझा रथ कुठंच दिसला नाही.''

इतक्यात रोहिणी कुठूनतरी धावत-धावत आली. ती फारच घाबरलेली दिसत होती. तिनं चांदोबाला घाईघाईनं सांगितलं, 'तो ढगांचा काळाकुट्ट राक्षस आहे ना, तो तुझा हरणांचा रथ अंधाऱ्या राजवाड्याकडे घेऊन जात होता. मी माझ्या डोळ्यांनी पाहिला.''

''त्या काळुंद्र्याची ही हिंमत?'' चांदोबा चवताळून म्हणाला, ''माझा रथ पळवतो काय? दाखवतोच त्याला इंगा! त्याशिवाय त्याची रग उतरायची नाही.'' असं म्हणत चांदोबा तावातावानं अंधाऱ्या राजवाड्याकडे जायला निघाला. चांदोबाला लांबूनच राक्षसाचा तो अंधारा राजवाडा दिसला. इतर कुणाला खरं म्हणजे तो दिसलाच नसता, कारण काळ्यामिट्ट काळोखानं भरला होता नुसता तो राजवाडा! काळ्याकाळ्या, चित्रविचित्र आकारांच्या ढगांनी बांधलेल्या त्या राजवाड्यातच तो ढगांचा राक्षस राहत असावा, हे चांदोबानं अचूक ओळखलं. कारण चांदोबाचा संचार रोज साऱ्या आकाशभर होत असे. आकाशातला कोपरान कोपरा त्याच्या ओळखीचा होता.

चांदोबा त्या वाड्यात शिरताच त्याच्या प्रकाशानं वाडा उजळून निघाला. इतक्यात - 'हा! हा! हा! हा!' असा मोठ्यानं हसण्याचा आवाज त्याला आला. समोर

वेड्यावाकड्या आकाराचा, काळ्याकभिन्न रंगाचा ढगांचा धिप्पाड राक्षस उभा होता. गडगडाट करीतच तो म्हणाला, "चांदोबा, पाहिलंस? तू आल्याबरोबर माझा वाडा कसा उजळून निघाला तो? असा प्रकाश माझ्या वाड्यानं कधीच पाहिला नाही. तेव्हा माझी तुला विनंती आहे की, तू माझ्या वाड्यात मुक्कामाला राहावंस."

चांदोबाचा राग अनावर झाला. तो ओरडून म्हणाला, "मूर्खा! लाज नाही वाटत वाटेल ते बडबडायला? माझा लाडका ससा नि हरणांचा रथ चोरून आणलास तो आणलास आणि वर मलाही इथं मुक्कामाला राहायला सांगतोस?"

"चांदोबा, शांत हो." राक्षस नम्रपणे म्हणाला, "तुझा रथ मी चोरला नाही. मुद्दाम पळवून आणला. म्हटलं रथाचा शोध काढीत तरी तू इथं येशील आणि मग माझ्या वाड्यात दिवाळी साजरी होईल."

"भित्र्या, चोरासारखी पळवापळवी कसली करतोस? हिंमत असेल तर दोन हात करायला तयार हो. तुला कंठस्नान घालूनच मला माझा रथ परत न्यावा लागेल." चांदोबा वर्दळीवर आला.

"चांदोबा, असा रागावू नकोस रे! मला तू खूप आवडतोस. तुझ्याशी दोन हात करायची माझी मुळीच इच्छा नाही. तुझा रथही मला हिरावून घ्यायचा नाही. तू इथं राहावंस एवढीच माझी इच्छा आहे. आता तूच पाहा.

साऱ्या जगाला तू प्रकाश देतोस; पण माझ्या वाड्यात मात्र तिन्हीत्रिकाळ आपला काळोखच. मला तू इतका आवडत असूनसुद्धा तुला माझ्या वाड्यात एकदाही यावंसं वाटत नाही ना? असा माझ्याकडून काय अपराध झालाय? चूक झाली असेल तर मला क्षमा कर; पण माझ्यावर असा रागावू नकोस.'' असं म्हणून राक्षसानं चांदोबापुढं अक्षरशः लोटांगण घातलं.

राक्षसाचं आपल्यावरचं प्रेम पाहून दयाळू चांदोबाचं मन विरघळलं. तो प्रेमानं म्हणाला, ''राक्षसा, ऊठ. तुझं म्हणणं मला पटलं. तुझ्या वाड्यात मी जरूर मुक्कामाला येईन; पण रोज नव्हे, फक्त वर्षातून एकदा, याच दिवशी. कारण देवानं मला वर्षभराचं काम वाटून दिलं आहे. ते मला पार पाडलंच पाहिजे. देवाची आज्ञा मोडून कसं चालेल? पण या दिवशी मात्र मी आठवणीनं तुझ्या वाड्यात येईन.'

चांदोबाचं आश्वासन ऐकून राक्षस खूष झाला. तो आनंदानं म्हणाला, ''एक दिवस तर एक दिवस. तू येशील तोच दिवस.'' मग त्या दिवशी चांदोबा राक्षसांच्या वाड्यातच राहिला. राक्षसानं मोठ्ठा उत्सव साजरा केला. सगळ्या वाड्यात आनंदीआनंद झाला.''

इकडे चांदोबा अंधाऱ्या राजवाड्यात गेल्याबरोबर सगळीकडे काळोख पडला. मुलांची तर कमालीची निराशा झाली. त्यांनी चांदोबाबरोबर किती गोडगोड बेत ठरवले

होते. चांदोबानंही नक्की येण्याचं आश्वासन दिलं होतं. मग त्यानं असं का केलं? नेमकी दिवाळीच्या दिवशी चांदोबाची गैरहजेरी मुलांना चांगलीच खटकली. एरवी आपला चांदोबा नियमानं येतो आणि आयत्या वेळी हे असं का? कित्येक मुलांनी तर ठरवलं की, आता चांदोबा आल्यावर त्याच्याशी गट्टी फूच करायची! पण ही तो आल्यानंतरची गोष्ट. आजचं काय?

चांदोबाशिवाय दिवाळी म्हणजे अगदीच काहीतरी! शेवटी साऱ्या मुलांनी ठरवलं की चांदोबाला शोधून काढायचं. पण अंधारात जायचं कसं त्याला शोधायला? कंदील घ्यायला हवेत बरोबर. मग मुलांनी रंगीबेरंगी कागदाचे, निरनिराळ्या आकारांचे नक्षीदार कंदील तयार केले अन् ते घेऊन मुलांची सेना निघाली चांदोबाला शोधायला. त्यांना रस्ता दिसावा म्हणून मोठ्या माणासांनीही दारोदारी दिवे लावले, पणत्या लावल्या. मात्र शोध-शोध शोधूनही मुलांना त्या दिवशी चांदोबा काही सापडला नाही.

दुसरा दिवसही तसाच गेला. मुलांचं कशातच लक्ष लागेना. त्यांना फराळात गोडी वाटेना की फटाके-फुलबाज्या उडवण्याची त्यांना इच्छा होईना. शेवटी दिवस मावळला. अंधार पसरू लागला आणि काल केलेले आकाशकंदील घेऊन सगळी मुलं पुन्हा चांदोबाच्या शोधाला निघाली. पण आज त्यांना चांदोबाचा शोध घ्यावा

लागला नाही. कारण समोरून चांदोबाचा तो सुरेख रथ धावत येत होता! मग काय विचारता? मुलांच्या आनंदाला पारावार उरला नाही. हातातले आकाशकंदील उंचावून, आरडाओरडा करीत, त्यांनी चांदोबाचं स्वागत केलं. चांदोबावरचा सारा राग ती विसरून गेली. तो जवळ येताच त्याच्याभोवती कोंडाळं करून मुलांनी त्याला विचारलं, "चांदोबा, तू कुठं गेला होतास रे काल? आम्ही तुझी किती किती वाट पाहिली!"

चांदोबा हसत म्हणाला, "मित्रांनो, मी की नाही, काल ढगांच्या राक्षसाच्या अंधाऱ्या वाड्यात गेलो होतो."

"बाप रे! राक्षसाच्या वाड्यात?" मुलं भीतीने उद्गारली.

"घाबरू नका. तो राक्षस दुष्ट नाही. तुमच्यासारखाच तो माझ्यावर प्रेम करतो." असं म्हणून त्यानं सारी हकिकत मुलांना सांगितली अन् तो म्हणाला, "दरवर्षी याच दिवशी मी त्या राक्षसाच्या वाड्यात जाणार. दिवाळीच्या पहिल्या दिवशी मी तुम्हांला भेटू शकणार नाही. पण म्हणून तुम्ही माझ्यावर रागावणार नाही ना?"

"नाही नाही, मुळीच नाही." मुलं ओरडली.

चांदोबानं विचारलं, "पण काय रे, हे रंगीबेरंगी कंदील कशाकरता तयार केलेत? लांबून येताना ते इतके सुरेख दिसत होते म्हणून सांगू - आपल्याला तर बुवा ते फारच आवडले!"

"अरे, हे तर तुला शोधण्याकरता तयार केले होते आम्ही. आवडले ना तुला? मग आम्ही दरवर्षी असेच कंदील तयार करू हं!" मुलं उत्तरली. आणि मग त्यांनी आखलेले बेत मोठ्या मजेत पार पाडले.

तेव्हापासून दरवर्षी असंच होतं. दिवाळीच्या पहिल्या दिवशी मुलांचा लाडका चांदोबा त्यांना भेटत नाही, पण मुलं मात्र न विसरता सुरेखसुरेख कंदील तयार करून उंचावर लावतात आणि खास चांदोबाला आवडणारे कंदील म्हणून त्यांना 'आकाशकंदील' म्हणतात.

* * *



प्रकाशक : रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., २१२, क्रिएटिव्ह इंड. इस्टेट, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई-११. ☎ : २३०७ ५८६७, २३०७ ५८९९
अक्षरजुळणी : अक्षय फोटोटाईपसेटर्स, डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे (प.)-१.
प्रतिरूप छपाई : मुद्रण अविष्कार, १९४-एम्, कात्रक कंपाऊंड, गायवाडी, गिरगांव, मुंबई-४.
जयहिंद प्रकाशन
नवीन आवृत्ती फेब्रुवारी २०१२
किंमत ५ रुपये


Lifebuoy
यंदाच्या पावसाळ्यात
10 इन्फेक्शन्स वाल्या
किटाणूंपासून राहा सुरक्षित+
रू. 10/-मध्ये 60 ग्रॅम
Lifebuoy
total
100% better germ protection+